


RNI NO-MAHMAR/2022/90217

# दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे  अंक : १९ वा  शनिवार  दि. १५  फेब्रुवारी २०२५  पृष्ठ ८  किंमत ३ रुपये

# पडद्यामागे काहीतरी मोठं घडतंय?

## धनंजय मुंडे अचानक अजित पवारांच्या भेटीला, प्रफुल्ल पटेलही देवगिरीवर दाखल...

**वृत्तसंस्था/मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा राज्याते अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे हे आज अचानक उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भेटीला गेले आहेत. अजित पवार यांच्या देवगिरी या शासकीय निवासस्थानी धनंजय मुंडे हे दाखल झाले आहेत. दोन्ही नेत्यांमध्ये जवळपास एक तासापासून चर्चा सुरु आहे. धनंजय मुंडे अचानक अजित पवारांच्या भेटीला का गेले आहेत? याचं कारण अद्याप समजू शकलेलं नाही. धनंजय मुंडे यांनी अचानक अजित पवारांची भेट घेतल्यामुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आलं आहे. विशेष म्हणजे धनंजय मुंडे हे अजित पवारांच्या देवगिरी बंगल्यावर दाखल झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल हे देखील तिथे दाखल झाले आहेत. त्यामुळे अजित पवारांच्या निवासस्थानी घडामोडींना वेग आलेला बघायला मिळत आहे. तीनही नेत्यांमध्ये नेमके काय खल सुरु आहेत ते अद्याप गुलदस्त्यात आहेत. पण राज्यातील घडामोडी पाहता काहीतरी नव्या घडामोडींचे हे संकेत तर नाहीत ना? अशी चर्चा आता सुरु आहे. बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मिक कराड हा जेलमध्ये आहे. या प्रकरणी धनंजय मुंडे यांच्यावरही विरोधकांनी गंभीर आरोप केले आहेत. तसेच अनेकांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. विशेष म्हणजे धनंजय मुंडे यांच्याच पक्षाचे आमदार प्रकाश सोळंके यांनीदेखील आरोपांनंतर धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदातून दूर व्हावं, असं म्हटलं होतं. पण आरोपांचं रान उठत असतानादेखील धनंजय मुंडे यांनी अद्याप राजीनामा दिलेला नाही. पण या प्रकरणात जो दोषी आढळेल त्याच्याबाबतीत हयगय केली जाणार नाही. त्याला सोडलं जाणार नाही, अशीदेखील भूमिका अजित पवार आणि राज्याचे



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे.महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या अनेक वेगवेगळ्या घडामोडी घडताना दिसत आहेत. या दरम्यान धनंजय मुंडे हे अजित पवारांच्या भेटीला गेले आहेत. एकीकडे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीगाठी घेत आहेत. दुसरीकडे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिल्लीत पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यानंतर शिंदेंच्या शिवसेनेच्या नेत्यांनी दिल्लीत शरद पवारांची भेटदेखील घेतली. तर बीडमध्ये संतोष देशमुख प्रकरणाचा तपास पुढे सरकत आहे. या सर्व घडामोडींदरम्यान धनंजय मुंडे हे अजित पवारांच्या भेटीला गेले आहेत.

# अरविंद सावंतांची एकनाथ शिंदे यांच्यावर सडकून टीका...

**वृत्तसंस्थत्त/ दिल्ली**

राजन साळवी यांनी आपल्या हजारो कार्यकर्त्यांसोबत शिवसेनेत प्रवेश केलाय. राजन साळवी यांनी अखेर उद्धव ठाकरे यांची साथ जोडलीये. राजन साळवी नाराज असल्याची सतत चर्चा होती. आता नुकताच अरविंद सावंत यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर जोरदार टीका केलीये. फक्त हेच नाही तर अरविंद सावंतांनी एकनाथ शिंदे यांना थेट पळकुटे देखील म्हटले आहे. मुख्यमंत्रिपद मिळाले नसल्याने एकनाथ शिंदे हे नाराज असल्याची चर्चा असतानाच शरद पवार यांनी थेट एकनाथ शिंदे यांचा सत्कार केला. अरविंद सावंत एकनाथ शिंदेंवर टीका करताना म्हणाले की, शिवसेना संघटना ही दिलेला शब्द पाळणारी आणि दिलेले नाते जपणारी संघटना आहे. कधी कधी हे नाते जपण्यात संघटनेचा तोटा जरी झाला पण नाते तुटणार नाही. नेता म्हणजे गड नव्हे शिवसेना म्हणजे गड आहे. जे गेले ते गेले जे आहेत त्यांना सोबत घेऊन संघटना पुढे वाढवायची असेही अरविंद सावंत यांनी म्हटले आहे.हे गद्दारी लोक आहेत. अगोदर गुजरातला गेले त्यानंतर आसामला गेले. एकनाथ शिंदे पळकुटे असल्याचेही त्यांनी यावेळी बोलताना अरविंद सावंतांनी म्हटले. एकनाथ शिंदे यांचा सत्कार शरद पवार यांनी केला, यामुळे आमच्या मनाला ठेच पोहोचली. कारण हे पळकूटे आहेत. आदित्य ठाकरे हे दिल्लीला राहुल गांधी आणि अरविंद केजरीवाल यांच्या भेटीसाठी आले होते. नुकताच झालेल्या दिल्लीच्या निवडणुकीमध्ये म्हणावे तसे यश आपला मिळाले नाही.उगवत्या सुर्याला तर सर्वजण नमस्कार करतात. मात्र, आदित्य ठाकरे यांनी राहुल गांधी आणि अरविंद केजरीवाल यांची भेट घेतली. मिलिंद देवराबद्दल बोलताना अरविंद सावंत म्हणाले, त्यांना त्यांच्या स्वत:च्या मतदार संघात दोनदा पराभूत व्हावे लागले. तिसऱ्यांदा पण पराभूत झाले असते, त्यांना उभा राहण्याचे धाडस झाले नाही. एका पदासाठी विकली गेलेली ही माणस त्यांना निती आहे का? असे म्हणताना अरविंद सावंत हे दिसले आहेत.

# शिवकीर्तन!निवृत्ती महाराज इंदुरीकर म्हणाले..सत्कर्मालाच देव मानणारे छत्रपती शिवराय सर्वश्रेष्ठ!

**जनसंचलन/बुलढाणा**

छत्रपती शिवाजी महाराज का श्रेष्ठ आहेत?.. तर त्यांनी उपास-तापास न करता किंवा कुठलाही आव आणून कर्मकांड न करता कर्मालाच देव मानले. ते सत्कर्मामुळे सर्वश्रेष्ठ बनले. त्यामुळे संपत्ती सोबतच दयाभाव ज्यांच्याकडे होता, तेच छत्रपती होते.. असे शिवगुणगाण महाराष्ट्रातले गाजलेले विनोदी किर्तनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदुरीकर यांनी करुन, बुलढाणा येथील छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या शिव जयंती सोहळ्याचा आरंभ दणक्यात केला. छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समिती बुलढाणाच्या वतीने २०२५ सालच्या शिवजयंती सोहळ्याचा आरंभ शुक्रवार १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी शिवनेरी जिजामाता क्रीडा व व्यापारी संकुल मैदानात ह.भ.प. इंदुरीकर महाराज यांच्या शिवकीर्तनाने झाला. अवघ्या दोनच दिवसापुर्वी ठरलेल्या या शिवकीर्तनासाठी जवळपास १५ हजार शिवप्रेमींचा जनसागर उसळला होता. सर्वत्र छत्रपती शिवरायांचा गजर सुरु होता. या शिव कीर्तनासाठी पुरुषांसह महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. एकीकडे सूर्य मावळत असतांना, शिवजयंती सोहळ्याची पहाट बुलढाण्यात उजाडत होती. सर्वप्रथम छत्रपती शिवरायांच्या मुर्तीचे पुजन व दिपप्रज्वलन कार्यक्रमाचे उद्घाटक धर्मवीर आमदार संजय गायकवाड व कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवसाई पतसंस्थेचे मार्गदर्शक नेत्रतज्ञ डॉ.वसंतराव चिंचोले, दौलतराव नरवाडे यांच्यासह आयोजक शिवजयंती समितीचे अध्यक्ष राजेंद्र काळे, सचिव उमेश शर्मा, प्रमुख पाहुणे ॲड.दिनोदे, माजी अध्यक्ष रणजीतसिंह राजपूत, मृत्युंजय गायकवाड डॉ. शोण चिंचोले, राजेश हेलगे, सुनिल सपकाळ, कोषाध्यक्ष अरविंद होंडे, निलेश भुतडा, प्रसिध्दी प्रमुख आदेश कांडेलकर, गोपालसिंग राजपूत यांच्यासह समितीचे पदाधिकारी व सांस्कृतिक समिती पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी माजी नगराध्यक्ष सौ. पूजाताई संजय गायकवाड यांच्यासह तहसीलदार व विविध क्षेत्रातील मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. ह.भ.प. इंदुरीकर महाराज पुढे बोलतांना म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्याईने शेतकर्यांचे आई-वडील कुठेही वृध्दाश्रमात नाही.



शेतकरी व गरीबांनी हा देश पिकवला. पोलिस, सैन्य, होमगार्ड आदी सेवेच्या क्षेत्रात गरीब व शेतकर्यांचीच मुले आहेत. छत्रपती शिवराय ग्रामविकास खात्याचे खरे निर्माते. छत्रपतींमुळेच देश अन् धर्म सुरक्षीत राहिला. सद्यस्थितीत शाळेमधून मोबाईल बंदीची खरी गरज आहे. आई-वडीलांची मान खाली जाणार नाही, असे जगा.. हीच खरी शिवजयंती, असेही ते म्हणाले. सुत्रसंचालन प्रा.अमोल वानखेडे यांनी केले. राष्ट्रगीताने शिवकीर्तनाची सांगता झाली.

# *!!! सूर्याच्या वर्णमय आवरणातील आयनीभवन !!!*

## संपादकीय लेख

मेघनाद साहा हे भारतीय भौतिकशास्त्रज्ञ होते. त्यांनी ऊष्मीय आयनीकरणाचे समीकरण मांडून त्यांचा उपयोग तारकेय वर्णपटांच्या स्पष्टीकरणासाठी केला. खगोल भौतिकीतील या महत्त्वाच्या कार्याकरिता ते प्रसिद्ध आहेत. साहा यांचा जन्म डाक्का जिल्ह्यातील सिओरात्तली आता बांगला देश येथे दि.६ ऑक्टोबर १८९३ रोजी झाला. त्यांनी कोलकाता येथील प्रेसिडेन्सी कॉलेजात प्रफुलचंद्र रॉय व सर जगदीशचंद्र बोस यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घेऊन सन १९१५मध्ये एमएस्सी आणि नंतर सापेक्षता सिद्धांत व प्रारण दाबाचे मापन या विषयांवर संशोधन करून पीएचडी संपादन केली. त्यानंतर त्यांनी लंडनच्या इंपिरियल कॉलेजमध्ये संशोधन करून डीएस्सी. पदवी मिळविली. ते कोलकाता विद्यापीठात भौतिकी विषयाचे खैरा प्राध्यापक- १९२१-२३, अलाहाबाद विद्यापीठात भौतिकीचे प्राध्यापक- १९२३-३८, पलित प्राध्यापक- १९३८-५२ आणि गुणश्री प्राध्यापक- १९५२-५६ होते. साहा यांनी आणवीय सिद्धांत आणि पुंजयामिकी यांमधील तत्त्वांचा वापर करून तारकेय वर्णपटांच्या चित्रलिपीचा सांकेतिक अर्थ शोधून काढण्याकरिता सर्वप्रथम प्रयत्न केला. तारकेय वातावरणातील तापमानाला- ६,०००ओसे. किंवा अधिक तार्‍याचे घटक असलेल्या पुष्कळशा अणूंच्या बाह्य कवचातील इलेक्ट्रॉन छेदले जातात. या आणवीय छेदन प्रक्रियेला इलेक्ट्रॉन गमावल्यामुळे आयनीकरण म्हणतात आणि छेदित अणूला आयन- विद्युत्भारित अणू म्हणतात. अशा प्रकारे तारकेय वातावरणात मुक्त इलेक्ट्रॉन आणि छेदित अणू यांचे वायुमय मिश्रण असते. साहा यांनी या मिश्रणास वायूचा गत्यात्मक सिद्धांत आणि ऊष्मागतिकी यांचे नियम लावले.

मेघनाद साहा यांचा जन्म दि.६ ऑक्टोबर १८९३ रोजी बांगलादेशची राजधानी ढाकाजवळील शाओराटोली गावात झाला. मेघनाद साहाच्या वडिलांचे नाव जगन्नाथ साहा होते. आईचे नाव भुवनेश्वरी देवी होते. त्यांचे वडील जगन्नाथ साहा हे एक छोटे दुकानदार होते. हालाकीची परिस्थिती असल्याने जगन्नाथ यांना आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाहाचा खर्च उचलणे कठीण जात होते. यासाठीच प्राथमिक शिक्षणानंतर मेघनाद यांनी दुकानाच्या कामात मदत करावी अशी त्यांची इच्छा होती. मात्र मेघनाद याची इच्छा पुढे शिक्षण घेण्याची होती.

त्यांच्या प्रश्नांनी शिक्षकही थक्क होत होते. मेघनाद साहा हे लहानपणापासूनच अतिशय हुशार होते. विज्ञान विषयाची त्यांना अधिक आवड होती. वर्गात त्यांनी विचारलेल्या प्रश्नांनी शिक्षकही थक्क होत होते. एकदा त्यांनी सूर्याभोवती वर्तुळ आकारात फिरणाऱ्या आवरणाबद्दल विचारले. ज्याचे उत्तर त्यांचे शिक्षक देऊ शकले नाही. त्यावेळी मेघनाद यांनी आपण याचा शोध लावून याची माहिती काढणार असल्याचे शिक्षकांना सांगितले होते. यावरून मेघनाद खूप हुशार असल्याचे शिक्षकांना जाणवले. मात्र त्याचे कुटुंबीय मेघनाद यांना पुढे शिकू देणार की नाही, असा प्रश्न शिक्षकांना पडला. मेघनाद यांचं शिक्षण थांबू नये, असे त्यांना वाटत होते. यानंतर त्यांनी स्वतः मेघनाद यांच्या पालकांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करण्याचे ठरवले. याबाबत शिक्षकाने मेघनाद याच्या भावाशी चर्चा केली. मेघनाद यांचा भाऊ त्यांच्या वडिलांकडे गेला आणि म्हणाला, मेघनाद अभ्यासात खूप हुशार आहे. त्याचे शिक्षकही तसे सांगत आहेत. त्याने पुढे शिक्षण घ्यावे, अशी शिक्षकांची इच्छा आहे. यावर वडिलांनी सांगितले की, मेघनाद खूप हुशार आहे. पण त्याला दुसऱ्या गावात शिक्षणासाठी जावे लागेल. ज्यासाठी त्याच्याकडे पैसे नाहीत. याबाबत मदत करण्यासाठी डॉ.अनंत यांच्याशी बोलू, असे मेघनाद यांच्या भावाने वडिलांना सांगितले. त्यांच्या वडिलांनी यावर आपली संमती दर्शवली. डॉ. अनंत कुमार हे एक कुशल आणि प्रभावी डॉक्टर होते. तसेच ते एक चांगले व्यक्ती देखील होते. डॉ. अनंत दास यांनी मेघनाद साहा यांना पुढील शिक्षणासाठी मदत केली. मेघनाद यांनी दुसऱ्या गावातल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेतला. पुढे ते डॉ.अनंत कुमार यांच्या घरी राहत होते. आपल्या मेहनतीच्या जोरावर मेघनाद साहा यांनी केवळ आपल्या शाळेतच नाही तर संपूर्ण ढाका जिल्ह्यात आठवीत सर्वाधिक मार्क मिळवले. त्यानंतर मेघनाद साहा यांना शिष्यवृत्ती मिळू लागली. सोबतच त्यांना ढाका येथील सरकारी हायस्कूलमध्ये प्रवेश मिळाला.

याच काळात देशभर स्वातंत्र्यलढ्याची आग धगधगत होती. मेघनाद याशी प्रभावित झाले होते. बंगालचे राज्यपाल त्यांच्या शाळेला भेट देणार होते. राज्यपालांच्या आगमनानिमित्त मेघनाद साहा यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह आंदोलनात भाग घेतला. याच्या परिणामी, मेघनाद यांची शिष्यवृत्ती बंद करण्यात आली. मेघनाद यांना त्यांच्या साथीदारांसह शाळेतून काढून टाकण्यात आले. मात्र त्यांना किशोरीलाल ज्युबिली स्कूल या खाजगी शाळेत प्रवेश मिळाला. पुढे साहा हे इंटरमिजिएट परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. नंतर कलकत्ता विद्यापीठात साहा यांनी संपूर्ण विद्यापीठात दुसरा क्रमांक पटकावला. हलाखीच्या परिस्थितीवर मात करत साहा यांची वाटचाल प्रगती आणि विकासाच्या दिशेने सुरू झाली.

कोणत्याही मूलद्रव्याच्या अणुंकरिता छेदन किंवा आयनीभवन केवळ उच्च तापमानामुळे घडून येत नसून ते नीच दाबामुळेसुद्धा घडते, हे साहा यांनी सप्रमाण सिद्ध केले. दाबातील न्यूनीकरणामुळे छेदन झाल्यानंतर उरलेला अणू आणि मुक्त इलेक्ट्रॉन यांची गाठ पडण्याची संधी अधिक कमी होते आणि पुनःसंयोग होण्याचा वेग कमी होऊन आयनीकरण वेग बदलत नाही. साहा यांनी सन १९२०मध्ये ङ्कसूर्याच्या वर्णमय आवरणातील आयनीभवनङ्क या विषयावरील एक निबंध फिलॉसॉफिकल मॅगझीनमध्ये प्रसिद्ध केला. रेडिओ तरंगांचे प्रेषण, ज्योतींचे संवहन, प्रज्योत आणि स्फोटक विक्रियांची रचना यांमधील समस्या सोडविण्याकरिता साहा यांचा आयनीभवन सिद्धांत उपयुक्त ठरला आहे. साहा यांनी कोलकाता येथील इन्स्टिट्यूट ऑफ न्यूक्लिअर फिजिक्स ही संस्था स्थापन करण्यात पुढाकार घेतला.

ते या संस्थेचे सन्माननीय संचालक होते. त्यांच्या मृत्यूनंतर या संस्थेला त्यांचे नाव देण्यात आले. ते लंडनच्या रॉयल सोसायटीचे सन १९२७ साली फेलो होते. सन १९३४मध्ये भारतीय विज्ञान परिषद संस्थेच्या एकविसाव्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. सन १९५२च्या सार्वत्रिक निवडणुकीत स्वतंत्र उमेदवार म्हणून ते लोकसभेवर निवडून आले होते. आयुष्याच्या अखेरच्या काळात त्यांनी आपले लक्ष विज्ञानाच्या सामाजिक कार्याकडे वळविले. सन १९३५मध्ये त्यांनी इतिहास, संस्कृती व विज्ञान यांना वाहिलेले सायन्स अँड कल्चर हे नियतकालिक सुरू केले. अशा या महान वैज्ञानिकाचे दि.१६ फेब्रुवारी १९५६ रोजी दिल्ली येथे निधन झाले.

!! महान शास्त्रज्ञ मेघनादजी साहा यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन !!

# धामणगाव बढेतील गजानन मंदिरात भक्तांची गर्दी

## प्रकट दिनानिमित्त धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**जनसंचलन/ धामणगाव बढे**

स्थानिक जामनेर रोडवरील गजानन नगरीत अवघ्या चार महिन्यांपूर्वी उभारलेल्या गजानन मंदिरात दररोज भाविकांची मांदियाळी पाहायला मिळते, तर आगामी प्रकट दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रकट दिन सोहळा १७ ते २० फेब्रुवारीदरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरा केला जाणार आहे. यामध्ये १७ ते १९ फेब्रुवारी दरम्यान सकाळी ४:३० ते ६.३० यावेळेत श्री संत गजानन महाराज दासगणू रचित ग्रंथ ४ दिवस प्रकट दिनानिमित्त धार्मिक कार्यक्रम पारायण होणार आहे. २० फेब्रुवारी रोजी प्रकट दिनाच्या दिवशी सकाळी ११ व सायंकाळी ७ वाजता महाआरती, दुपारी नगर प्रदक्षिणा, रात्री ८ वाजता ह.भ.प. शिवदास महाराज राहणे (पान्हेरा) यांचे श्रीहरी कीर्तन, तर सकाळी ९ ते ३ वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. धामणगाव बढे



येथील निसर्गरम्य वातावरणात वसलेले हे गजानन महाराज मंदिर भाविकांचे श्रद्धास्थान बनले आहे. येथे आयोजित कार्यक्रमात भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत. नियमित धार्मिक कार्यक्रम आणि भक्तांची वाढती संख्या पाहता हे ठिकाण प्रति शेगाव म्हणून नावारूपास येत आहे. धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# करियर कौन्सिलिंग सेल मार्फत व्याख्यान संपन्न.

**जनसंचलन/ खामगांव**

विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ खामगाव द्वारा संचलित गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय खामगाव येथे करिअर कौन्सिलिंग अँड गाईडन्स मार्फत प्रा. डॉ. पी. पी. ठाकूर यांचे करिअरच्या संधी या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आली होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. तळवणकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन करियर कौन्सिलिंगचे समन्वयक डॉ. एच. डी अकोटकर यांनी केले. व्याख्याते प्रा. डॉ. पी. पी. ठाकूर विद्यार्थ्यांना संबोधित करताना म्हणाले की, भाषेच्याद्वारे अनेक संधी रोजगाराच्या उपलब्ध आहेत. भाषा हे रोजगार मिळवून देण्याचं प्रभावी साधन आहे म्हणून विद्यार्थ्यांनी भाषेवर प्रभुत्व मिळवले पाहिजे. इंग्रजी, हिंदी, मराठी या भाषा प्रत्येकाला आल्याच पाहिजेत. कोणत्याही क्षेत्रात जा भाषे शिवाय कोणतेही कार्य होत नाही. कार्पोरेट जगात अनेक क्षेत्र आहेत जिथे भाषेच्या विद्यार्थ्यांना संधी आहेत. जाहिरात लेखन असेल, इतिवृत्त लेखन, मालिका, कथा, नाटक, मुद्रितशोधक, बातमी कार निवेदक संपादक अशा विविध क्षेत्रात भाषेचे विद्यार्थी काम करू शकता असे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयातील बी.ए., बी.कॉम., बी.एस.सी., एम.ए., एम.एस.सी., चे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. संदीप शिंदे यांनी केले. या कार्यक्रमाला प्रा. टकले, प्रा. व्हि. यु. मोरे, प्रा. डॉ. शेखर खडसे, प्रा. बानाईत, प्रा. खंदारे, प्रा. गवई, प्रा. भूतेकर, आधी महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते. अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रसिद्धी प्रमुख प्रा. डॉ. मोहम्मद रागिब देशमुख यांनी दिली आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# महाराष्ट्राच्या राजकारणातील सर्वात मोठी बातमी,
# महाराष्ट्र काँग्रेसला नवा प्रदेशाध्यक्ष मिळाला...

## राजकीय क्षेत्रातील योगदान:

१) विद्यामान राष्ट्रीय अध्यक्ष- राजीव गांधी पंचायत राज संगठन
२) जेष्ठ पक्ष निरिक्षक - ओडिसा लोकसभा/विधानसभा २०२४
३) राष्ट्रीय सचिव- अ.भा.काँ.कमेटी नवी दिल्ली- सह प्रभारी गुजरात- मध्यप्रदेश -पंजाब (दहा वर्ष)
४) राष्ट्रीय उपाध्यक्ष- राजीव गांधी पंचायत राज संगठन
५) माजी अध्यक्ष- जिल्हा परिषद बुलढाणा (१९९९ ते २००२)
६) माजी विधान सभा सदस्य- २२ बुलडाणा विधानसभा (२०१४ ते २०१९)
७) माजी सदस्य- जिल्हा परिषद बुलढाणा (१९९७ से २००६)
८) शिबिर समन्वयक- गांधी विचार दर्शन सेवाग्राम (अ.भा.काँ.कमिटी द्वारा आयोजन)
९) पक्ष निरिक्षक- अनेक राज्यांमध्ये निवडणुकीच्या अनुषंगाने.
१०)माजी उपाध्यक्ष- महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस.



## हर्षवर्धन सपकाळ यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान :

१) गांधी तथा विनोबा यांच्या विचारधारेवर आधारीत ग्राम-स्वराज निर्माण
२) सर्वोदय विचारांवर आधारीत राष्ट्रनिर्माण युवक शिबिरे
३) ग्रामस्वच्छता अभियान तथा आदर्श ग्राम चळवळीत सक्रिय योगदान
४) जलसंधारण व जलव्यवस्थापन प्रकल्पांची अंमलबजावणी.
५) आदिवासी समुदायाचे तथा गावांचे सक्षमीकरण.

**मुंबई :** महाराष्ट्र काँग्रेसच्या नव्या प्रदेशाध्यक्षांची अखेर घोषणा करण्यात आली आहे. बुलढाण्याचे माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ यांची काँग्रेसचे महाराष्ट्राचे नवे प्रदेशाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. काँग्रेसकडून अधिकृतपणे प्रसिद्धीपत्रक जारी करुन याबाबत माहिती देण्यात आली आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी हर्षवर्धन सपकाळ यांची महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष म्हणून नियुक्ती केल्याचं संबंधित पत्रकात म्हटलं आहे. काँग्रेसच्या या घोषणानेसह काँग्रेस नेते नाना पटोले यांची प्रदेशाध्यक्षपदाचा कार्यकाळ अखेर आता संपला आहे. नाना पटोले यांनी नुकतंच दिल्लीत जावून काँग्रेस श्रेष्ठींची भेट घेतली होती. त्यावेळीच त्यांनी महाराष्ट्र काँग्रेसला नवा प्रदेशाध्यक्ष मिळणार असल्याचे संकेत दिले होते. अखेर पक्षाकडून नव्या प्रदेशाध्यक्षांची घोषणा करण्यात आली आहे. हर्षवर्धन सपकाळ हे काँग्रेसचे निष्ठावान नेते आहेत. त्यांच्यावर पक्षाने अखेर मोठी जबाबदारी सोपवली आहे. हर्षवर्धन सपकाळ हे २०१४ ते २०१९ या काळात बुलढाणा मतदारसंघाचे आमदार होते. तसेच ते बुलढाणा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष आहेत. हर्षवर्धन सपकाळ हे राजीव गांधी पंचायत राज संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. ते काँग्रेसच्या राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होत असतात. याशिवाय सपकाळ हे गांधी परिवाराचे जवळचे मानले जातात.

हर्षवर्धन सपकाळ कोण आहेत?

युवावस्थेपासूनच गाडगे महाराज, तुकडोजी महाराज व गांधीवादी - सर्वोदयी कार्यकर्ता म्हणून परिचित आहेत. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस संलग्नित राजीव गांधी पंचायत राज संघटनचे विद्यमान अध्यक्ष आहेत. भारतीय राष्ट्रीय विद्यार्थी संघटनाच्या माध्यमातून राजकीय जीवनात सक्रीय झाले. महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस चे उपाध्यक्ष राहिलेले आहेत. त्यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातून बी.कॉम व बी. पी.एड पदवी धारण केलेली आहे. शेतकरी कुटूंबातून आलेले असून सामाजिक कार्य व राजकीय क्षेत्रात कार्यरत आहेत. ग्राम स्वराज्याच्या संकल्पपूर्तीसाठी महाराष्ट्रात सुरू केलेल्या संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत त्यांनी विशेष योगदान दिले आहे. ग्रामस्वच्छता तथा आदर्श ग्राम निर्माण या क्षेत्रातील त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. युवकांसाठी युवक शिबिराच्या नियमित सातत्याने आयोजन, ही त्यांची वैचारिक प्रतिबध्दता दर्शविते. तसेच ही एक फार मोठी उपलब्धी समजली जाते. शेतीस्वावलंबनासाठी तसेच टंचाईमुक्तीसाठी त्यांनी आपल्या विधानसभा मतदार संघात केलेला जलवर्धन प्रकल्पाच्या माध्यमातून जलव्यवस्थापन तथा जलसंधारण क्षेत्रात त्यांनी विशेष उल्लेखनीय कार्य केले आहे.बुलढाणा जिल्ह्यातील आदिवासी तथा आदिवासी गावांचे सक्षमीकरण करण्यासाठी गेल्या २५ वर्षांपासून सातत्याने प्रयत्नशील तथा कटीबध्द आहेत. १९९९ से २००२ या कालावधीत महाराष्ट्रातील सर्वात तरूण जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्या कार्यकाळात बुलढाणा जिल्हा परिषद ही महाराष्ट्रात अव्वल होती, हे येथे विशेष उल्लेखनीय. तसेच २०१४ ते २०१९ या कालावधीत ते बुलढाणा विधान सभा मतदार संघात विधान सभा सदस्य म्हणून राहिले आहेत.अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस च्या माध्यमातून राजकीय क्षेत्रात सद्यस्थितीत राष्ट्रीय अध्यक्ष, राजीव गांधी पंचायत राज संगठन म्हणून कार्यरत आहेत. तसेच यापूर्वी राष्ट्रीय सचिव, अ.भा. काँ.कमेटी नवी दिल्ली व राष्ट्रीय उपाध्यक्ष, राजीव गांधी पंचायत राज संगठन ही जबाबदारी सुध्दा पार पाडलेली आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीवर्षाच्या निमित्ताने त्यांनी बुलढाणा विधानसभा मतदार संघात संविधान चेतना यात्रेच्या माध्यमातून प्रत्येक गाव-वस्ती-वाडीपर्यंत संविधान जागृतीसाठी कार्य केले आहे.काँग्रेसचे सचिव म्हणून पंजाब चे सहप्रभारी म्हणून सुध्दा काम केले आहे. तसेच तत्पूर्वी गुजरात व मध्यप्रदेश या राज्यांचे सुध्दा सहप्रभारी म्हणून जबाबदारी पार पाडलेली आहे. अ.भा. काँ.कमिटी द्वारा सेवाग्राम-वर्धा येथील गांधी आश्रमात आयोजित देशव्यापी गांधी विचार दर्शन शिबिराचे राष्ट्रीय शिबिर समन्वयक म्हणून पक्षाने सोपविलेली जबाबदारी त्यांनी यशस्वीतारित्या पार पाडलेली आहे. यासोबतच विविध राज्यातील विधान सभा निवडणूकीत उमेदवार निवडीसाठी पक्षाने स्थापित केलेल्या स्क्रिनिंग कमिटीचे सुध्दा ते सदस्य राहिलेले आहेत.एकविसाव्या शतकातील वैश्विक मित्रता अभियान अंतर्गत जपान इंटरनॅशनल कॉर्पोरेशनच्यावतीने १९९६ मध्ये जपान या देशांमध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय युवा परिषदेसाठी त्यांनी २० भारतीय युवक प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व केलेले आहे.

# मुंबई पोलिसांच्या तपासावर शंका? अपघात प्रकरणी उर्मिला कोठारेची हायकोर्टात धाव, याचिकेत असाही आरोप...

**मुंबई:** गेल्या वर्षी डिसेंबर महिन्याच्या शेवटी २८ तारखेला मराठी सिनेइंडस्ट्रीतील लोकप्रिय अभिनेत्री उर्मिला कोठारे हिचा अपघात झाला. या अपघातात ती जखमी झाली होती, तसंच या एका मजुराचा मृत्यू झाला होता. या प्रकरणाचा पोलिस तपास करत आहे. मात्र मुंबई पोलिसांच्या तपासावर उर्मिला नाराज असल्यानं तिनं मुंबई हाय कोर्टात धाव घेतल्याची माहिती आहे. या अपघाताचा तपास सीआयडी किंवा अन्य तपास यंत्रणेकडं देण्यात यावा, अशी मागणी तिनं केल्याचं म्हटलं जात आहे. डिसेंबर महिन्यात २८ तारखेच्या रात्री उर्मिला शूटिंग संपवून घरी निघाली होती.उर्मिलाच्या कारची कार तिचा ड्रायव्हर चालवत होता. या अपघातात रस्त्यावर काम करणाऱ्या दोन मजूरांनाही कारची धडक बसली. एक मजूर जखमी झाला, तर एकाचा मृत्यू झाला. या घटनेनंतर पोलिसांनी कारच्या ड्रायव्हरवर गुन्हा दाखल केला होता, तसंच त्याला अटकही करण्यात आली आहे. मात्र मुंबई पोलिस या घटनेचं सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध करून देत नसल्याची तक्रार उर्मिलानं हाय कोर्टात याचिका दाखल करताना केली आहे. उर्मिलानं घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध करून देण्यात यावे, अशी विनंती मुंबई पोलिसांना केली होती. मात्र या परिसरात कोणतेही सीसीटीव्ही नाहीयेत,असं पोलिसांकडून सांगण्यात आलंय. यानंतर उर्मिलानं हायकोर्टात धाव घेतली आहे. इतकंच नाही तर पोलिस एका खासगी कंपनीला पाठीशी घालण्यासाठी सीसीटीव्ही देत नसल्याचंही तिनं म्हटलं.

**अपघाताला कंत्राटदारही जबाबदार**

तर या अपघाताला मेट्रोचा कंत्राटदारही तितकाच जबाबदार असल्याचं उर्मिलानं तिच्या याचिकेत म्हटलं आहे. अपघात स्थळी मेट्रोचं काम सुरू होतं. रस्त्याची कामं सुरू असताना पर्यायी मार्गाचे फलक, तसंच दिशादर्शक फलक लावले गेले



पाहिजे होते, पण तिथे नव्हते, त्यामुळं अपघातासाठी हे कंत्राटदारही जबाबदार असल्याचं तिनं म्हटलंय.

**तर आणखी वाईट घडू शकलं असतं..**

दरम्यान, अपघातानंतर उर्मिलाला खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. तिथं काही दिवस उपचार झाल्यानंतर ती घरी परतली. यानंतर तिनं पोस्ट शेअर करत घटनाक्रम सांगितला होता.

# मोठ्या मनाचा विराट!

## रजत पाटीदारची कॅप्टनपदी निवड




**मुंबई :** आयपीएल २०२५ च्या मोसमाला सुरूवात होण्याआधी आता काही संघ आपल्या कर्णधारांची घोषणा करत आहे. पंजाब किंग्स आणि लखनऊ सुपरजायंट्सनंतर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनेही आपल्या नवीन कर्णधाराच्या नावाची घोषणा केली आहे. आयपीएल २०२५ मध्ये पुन्हा एकदा विराट कोहलीकडे कर्णधारपद जाणार अशी चर्चा होत होती. मात्र तसं काही झालं नाही. कारण विराटसोबतच रजत पाटीदार याचेही नाव चर्चेत होते. यामधील रजत पाटीदार यांची कर्णधारपदी वर्णी लागली आहे. विराट कोहलीची निवड जरी झाली नाही मात्र तो अजिबात नाराज नाही. उलट विराटने रजतला शुभेच्छा देत त्याला शुभेच्छा देत पाठिशी असल्याचं म्हटलं आहे. सर्वप्रथम मी पाटीदारला शुभेच्छा देऊ इच्छितो. ज्याप्रकारे गेल्या काही सीझनमध्ये त्याने झकास कामगिरी करत सर्वांची मने जिंकली आहेत. त्यासोबतच आरसीबीच्या चाहत्यांच्या मनामध्येही आपलं वेगळं स्थान निर्माण करण्यात यशस्वी ठरला आहे. सगळे तुला खेळताना पाहण्यासाठी उत्साहित आहेत. कर्णधारपदासाठी पात्र होतास, टीममधील प्रत्येक खेळाडू तुझ्यासोबत असून तुला पाठिंबा देऊत. ही मोठी जबाबदारी असून मी गेले अनेक वर्षे आणि आता मागे फाफ डु प्लेसिसने सांभाळली आहे. तु इथपर्यंत आलास, मला विश्वास आहे की तू एकदम कणखर राहशील, असं विराट कोहलीने म्हटलं आहे.रजत पाटीदारला एक खेळाडू म्हणून मोठा होताना पाहिलं आहे. त्याला टीम इंडियाकडून खेळण्याची संधी मिळाली आहे. मागील काही वर्षांमध्ये त्याच्या खेळामध्ये आमूलाग्र बदल झालेला पाहायला मिळाला. मध्य प्रदेश संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी सांभाळताना त्याने स्वत:ला सिद्ध करून दाखवलं की तो आरसीबीच्या कर्णधारपदाची जबाबदारीहू पार पाडू शकतो, असं विराट म्हणाला.

दरम्यान, आयपीएलच्या पहिल्या मोसमापासून आरसीबी हा संघ स्पर्धेत खेळत आहे. मात्र एकदाही ट्रॉफी उंचवता आलेली नाही. रजत पाटीदार हा या टीमचा आठवा कर्णधार ठरला आहे. त्याआधी राहुल द्रविड, अनिल कुंबळे आणि विराट कोहली या तीन भारतीय खेळाडूंनी कर्णधारपदाची जबाबदारी सांभाळली आहे. तर चार विदेशी खेळाडूंनीही जबाबदारी पार पाडली मात्र एकालाही विजेतेपदावर नाव कोरता आलं नाही.



# रोहित शर्माची चिंता आणखी वाढली

**अहमदाबाद :** चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी भारताला अजून एक मोठा धक्का बसला आहे. जसप्रीत बुमराह दुखापतीमुळे या स्पर्धेत खेळणार नसल्याचे समोर आल्यावर आता भारताला अजून एक मोठा धक्का बसला आहे. कारण भारताच्या मॅचविनर खेळाडूला गंभीर दुखापत झाली आहे. भारताचा कर्णधार रोहित शर्मानेच आता ही माहिती दिली असून त्याची चिंता आता आणखी वाढलेली आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीला सुरुवात होण्यापूर्वी आता भारताला एकामागून एक धक्के बसायला सुरुवात झाली आहे. मंगळवारी रात्री जसप्रीत बुमराह चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये खेळणार नसल्यो वृत्त आले आणि सर्वांनाच मोठा धक्का बसला. जसप्रीत बुमराहच्या जागी आता हर्षित राणा हा भारतीय संघात आला आहे. या गोष्टीला २४ तासही झाले नाहीत तर भारताला अजून एक मोठा धक्का बसला आहे. त्यामुळे आता भारतीय संघात नेमकं चाललंय तरी काय, असा प्रश्न चाहते विचारायला लागले आहेत.भारत आणि इंग्लंड यांच्यातील तिसरा वनडे सामना सुरु होण्यापूर्वी रोहित शर्माने याबाबतची माहिती दिली. रोहित शर्मा या तिसऱ्या मॅचच्या टॉससाठी मैदानात आला होता. टॉसनंतर रोहित शर्माने सांगितले की, ङ्क तिसऱ्या वनडे सामन्यात आम्हाला काही मोठे बदल करावे लागले आहेत. भारतीय संघातील अजून एका खेळाडूला दुखापत झाली आहे. वरुण चक्रवर्तीच्या पायांच्या पोटऱ्यांमध्ये गंभीर दुखापत झाली आहे. ही दुखापत गंभीर असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे त्याला तिसऱ्या वनडे सामन्यात खेळता येणार नाही. वरुणच्या दुखापतीवर आम्ही लक्ष ठेवून आहोत आणि यापुढे त्याच्याबाबत काय निर्णय घ्यायचा हे वैद्यकीय अहवाल समोर आल्यावरच ठरवणार आहेत. वरुण चक्रवर्तीला यशस्वी जयस्वालच्या जागी भारतीय संघात स्थान देण्यात आले होते. पण आता त्याला दुखापत झाली असून तो चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये खेळू शकणार नसल्याचे म्हटले जात आहे. पण याबाबतची अधिकृत माहिती आता समोर आलेली नाही.भारताला चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी आता दुसरा धक्का बसला आहे. आता भारताचा दुसरा मॅचविनर खेळाडू दुखापतग्रस्त झाला आहे.

# सावधान, दुपारच्या जेवणात चुकूनही खाऊ नका हे ५ पदार्थ, पोटात होईल भयंकर गॅस, आतड्यांना बसेल पीळ, शौचाचा होईल खडा...

जेवण ही आपल्या दैनंदिन जीवनातील सर्वात महत्त्वाची प्रक्रिया असते. आपल्या शरीराचे ऊर्जास्तर, पचनसंस्था आणि एकूण आरोग्य हे आपल्या आहारावर अवलंबून असते. विशेषतः दुपारच्या जेवणाचा प्रभाव हा आपल्या शरीरावर लक्षणीय स्वरूपात जाणवतो, कारण याच वेळी शरीर जास्त प्रमाणात अन्नाचे पचन करण्यासाठी कार्यरत असते. अनेकदा लोक अयोग्य आहार घेतल्यामुळे अपचन, गॅस, पोट फुगणे, जडपणा आणि अन्न न पचल्याने होणारा थकवा यासारख्या समस्या अनुभवतात. काही पदार्थ असे असतात, जे आपण अज्ञानामुळे किंवा फक्त चव हवी म्हणून दुपारच्या जेवणात खातो, पण ते पचनासाठी हानिकारक ठरू शकतात. त्यामुळे शरीरात आम्लता वाढते आणि गॅस होण्याचा धोका वाढतो. या लेखात आपण दुपारच्या जेवणात टाळावयाचे काही विशिष्ट पदार्थ जाणून घेणार आहोत, जे आपल्या पचनसंस्थेसाठी अपायकारक ठरू शकतात. जर तुम्हाला हलके आणि पोषणमूल्ययुक्त जेवण हवे असेल, तर हे पदार्थ टाळणे अत्यावश्यक आहे.

### तळलेले आणि जास्त तेलकट पदार्थ

दुपारच्या वेळी तळलेले आणि तेलकट पदार्थ खाल्ल्यास पचनसंस्थेवर मोठा ताण येतो. तेलकट पदार्थ शरीराला जड वाटतात आणि ते पचण्यासही अधिक वेळ लागतो. यामुळे अपचन, गॅस, पोटदुखीचा त्रास होतो.



फास्टफूड, समोसे, भजी, तळलेले पराठे आणि मोठ्या प्रमाणात तुपाचा वापर केलेले पदार्थ यामुळे अपचनाच्या समस्या वाढू शकतात. अशा पदार्थांमुळे शरीरातील कोलेस्ट्रॉल पातळीही वाढते, त्यामुळे वजन वाढण्याची शक्यता अधिक असते. जर तुम्हाला दुपारच्या वेळी ऊर्जा टिकवून ठेवायची असेल आणि झोप येऊ नये असे वाटत असेल, तर हलका आणि संतुलित आहार घेणे गरजेचे आहे.

### जास्त प्रमाणात मसालेदार आणि मिरपूडयुक्त अन्न

मसाले आणि मिरपूड यांचा अतिरेक केल्यास ते शरीरात आम्लता वाढवतात आणि पचनसंस्थेवर ताण आणतात. दुपारच्या वेळी जास्त प्रमाणात तिखट पदार्थ खाल्ल्यास पोटात जळजळ, गॅस, अपचन आणि ॲसिडिटी यांसारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. मसालेदार अन्नामुळे शरीराचा उष्णता स्तर वाढतो आणि त्यामुळे जळजळ, आंबट ढेकर, छातीत जळजळ आणि अस्वस्थता निर्माण होऊ शकते. यासाठी दुपारच्या जेवणात जड आणि जास्त मसालेदार पदार्थ टाळून हलके आणि




सोपे पचणारे पदार्थ खाणे अधिक चांगले ठरते.

### खूप गोड पदार्थ आणि मिठाई

अनेक लोकांना दुपारच्या जेवणानंतर गोड पदार्थ खाण्याची सवय असते, परंतु हे आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. अतिरिक्त साखर असलेले पदार्थ लघवीची आम्लता वाढवतात, तसेच पचनसंस्थेच्या कार्यक्षमतेवर परिणाम करतात. यामुळे झोप येण्याची शक्यता जास्त असते आणि शरीर सुस्त वाटते. गोड पदार्थांमुळे रक्तातील साखर पटकन वाढते आणि लगेच कमी होते, त्यामुळे ऊर्जेची कमी जाणवते आणि थकवा येतो. त्याऐवजी दुपारच्या वेळी गोड पदार्थ न खाता फळे किंवा नैसर्गिक साखरयुक्त पदार्थ खाणे अधिक चांगले ठरते.

### फळे आणि कच्च्या भाज्या

फळे आणि कच्च्या भाज्या आरोग्यासाठी फायदेशीर असल्या, तरीही दुपारच्या जेवणासोबत किंवा त्यानंतर लगेच फळे खाणे योग्य नाही. फळांमध्ये नैसर्गिक साखर आणि फायबर असते, जे पचनसंस्थेसाठी आवश्यक असले तरीही, जेवणानंतर लगेच फळे खाल्ल्यास अन्न पचण्याची प्रक्रिया बिघडू शकते. फळांमधील साखर लवकर पचते, तर दुपारचे जेवण हळूहळू पचते, त्यामुळे दोन्ही प्रक्रियांमध्ये विसंगती निर्माण होते आणि त्यामुळे गॅस, फुगणे, आणि अपचनाचा त्रास होतो. त्यामुळे फळे खायची असल्यास ती दुपारच्या जेवणानंतर किमान १-२ तासांनी खावीत.

### गरम आणि थंड पदार्थ एकत्र सेवन करणे

अनेक लोकांना दुपारच्या जेवणासोबत कोल्ड ड्रिंक्स, आईस्क्रीम किंवा थंड ताक प्यायची सवय असते. गरम अन्न आणि थंड पेय एकत्र घेतल्याने पचनसंस्था बिघडते. त्यामुळे पचनसंस्थेतील एंझाइम्स योग्य प्रकारे कार्य करत नाहीत आणि अन्न पूर्णपणे न पचल्याने गॅस आणि जडपणा जाणवतो. जर दुपारच्या जेवणानंतर काही प्यायचेच असेल, तर कोमट पाणी किंवा लिंबूपाणी हे पर्याय अधिक चांगले ठरतील. थंड पेय पचनसंस्थेच्या हालचाली मंदावतात आणि त्यामुळे अन्न पचायला अधिक वेळ लागतो. यामुळे शरीरात आम्लता आणि अपचनाची समस्या निर्माण होऊ शकते. जर तुम्हाला दुपारच्या जेवणानंतर हलके आणि ताजेतवाने वाटावे, तर जड, मसालेदार, तेलकट, गोड आणि तळलेले पदार्थ टाळा. याऐवजी घरगुती, संतुलित आणि नैसर्गिक पदार्थांचा समावेश केल्यास आरोग्य चांगले राहील आणि पचनसंस्था मजबूत होईल.

# पांढरे केस नैसर्गिकरित्या कसे काळे करावे? पिवळे दाणे आठवड्यात कोळश्यसारखे काळे होतील केस

वाढत्या वयानुसार केस पांढरे होणे सामान्य आहे. पण आजकाल, केस पांढरे होण्याची समस्या तरुणांमध्येही दिसून येत आहे. पांढरे केस एखाद्या व्यक्तीचे व्यक्तिमत्व आणि आत्मविश्वास कमी करू शकतात. हेच कारण आहे की सर्वांना काळे केस हवे असतात. केस काळे ठेवण्यासाठी लोक अनेकदा केमिकलयुक्त हेअर डाय वापरतात. पण, जर तुम्हाला हवे असेल तर तुम्ही घरगुती उपायांनी तुमचे केस काळे ठेवू शकता किंवा पांढरे केस काढून टाकू शकता. मेथीचे दाणे हा असाच एक घरगुती उपाय आहे, जो केसांचे आरोग्य सुधारण्यासाठी खूप प्रभावी ठरतो. मेथीचे दाणे केसांना मुळांपासून मजबूत करतात. तसेच, ते पांढरे केस काळे करण्यास मदत करते. केस काळे करण्यासाठी तुम्ही मेथीच्या दाण्यांचा वापर देखील करू शकता.पांढरे केस नैसर्गिकरित्या काळे कसे करायचे ते जाणून घेऊया.यामुळे केस काही दिवसातच काळे होतील. मेथीचे दाणे केस काळे करण्यासाठी फायदेशीर




आहेत. जर तुमचे केस पांढरे झाले असतील तर तुम्ही मेथीचे दाणे वापरू शकता. मेथीचे दाणे केस काळे ठेवण्यास देखील मदत करतात . खरंतर, मेथीच्या बियांमध्ये अँटीऑक्सिडंट गुणधर्म आढळतात, जे केसांचे आरोग्य सुधारण्यास आणि केस काळे ठेवण्यास मदत करतात.

मेथीच्या दाण्यांमध्ये लेसिथिन आणि प्रथिने मुबलक प्रमाणात आढळतात हे आम्ही तुम्हाला सांगतो. हे दोन्ही घटक केसांना खोलवर पोषण देतात आणि ते पांढरे होण्यापासून रोखतात.

याव्यतिरिक्त, मेथीचे दाणे मेलेनिनचे उत्पादन वाढवतात, जे केसांचा नैसर्गिक रंग राखण्यासाठी आवश्यक आहे. मेथीच्या बिया वापरल्याने तुमच्या केसांना अनेक फायदे मिळतील. त्यात प्रथिने आणि निकोटिनिक ॲसिड असते, जे केसांना आतून मजबूत करते. यासोबतच, त्यात असे अनेक घटक आढळतात, जे केसांना चमकदार बनविण्यास मदत करतात. याच्या वापराने केसांमधील कोंड्याची समस्याही संपते.तुम्ही मेथीच्या बियांची पेस्ट बनवून केसांना लावू शकता.

यासाठी प्रथम मेथी काही वेळ पाण्यात भिजत ठेवा. ते सुमारे अर्धा तास पाण्यात भिजवा आणि नंतर त्याची पेस्ट बनवा. ही पेस्ट केसांच्या मुळांपासून टोकांपर्यंत लावा आणि सुमारे ३० मिनिटांनी साध्या पाण्याने केस धुवा. यामुळे तुमचे केस मजबूत होतील. केसांसाठी मेथीचे दाणे वापरण्याचा हा सर्वात सोपा मार्ग आहे. यासाठी प्रथम नारळाचे तेल घ्या आणि त्यात मेथीचे दाणे घाला. ते चांगले गरम करा आणि थंड झाल्यावर या तेलाने डोक्याला मालिश करा. आता एक तास असेच राहू द्या. एक तासानंतर केस धुवा. काही दिवसांनी तुम्हाला त्याचा परिणाम दिसायला लागेल.

# मांत्रिकाकडून वीस वर्षीय विवाहितेवर अत्याचार, खळबळजनक प्रकार उघडकीस



**अमरावती :** अंगावर लिंबू घासल्याने तुझा गर्भपात होणार नाही, अशी बतावणी करून एका मांत्रिकाने २० वर्षीय विवाहितेवर अत्याचार केला. सदर प्रकाराची वाच्यता न करण्यासाठी जादूटोणा करेल व तुला पाहून घेईल, अशी धमकी त्याने महिलेला दिली. ही धक्कादायक घटना गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. या प्रकरणी पीडित विवाहितेच्या तक्रारीवरून आरोपी मांत्रिकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिगांबर रतन चव्हाण महाराज असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे पीडित २० वर्षीय विवाहिता ही अचलपूर तालुक्यातील रहिवासी आहे. ६ एप्रिल २०२४ रोजी तिचे लग्न झाले. लग्नानंतर पीडितेचा तीनदा गर्भपात झाला. तिचे पोट नेहमीच दुखत व सुजत असल्याने परतवाडा व अमरावती येथे उपचार करण्यात आले. दरम्यान, ५ फेब्रुवारी रोजी नात्यात असलेला आरोपी दिगांबर रतन चव्हाण महाराज हा त्यांच्या घरी पोहोचला. त्याने पीडित विवाहितेच्या पतीचा हात पाहिला. त्यांच्या अंगावर लिंबू घासले. त्यानंतर त्याने पीडित विवाहितेचा हात हातात घेतला.महिलेचा हात हातात घेतल्यानंतर मांत्रिकाने म्हटले की, बाहेरचे तीन लोक लागले आहेत. त्यावेळी त्याने विवाहितेच्या सर्व अंगावर लिंबू घासले. हात, कमर, गळा व दोन्ही पायांत बांधायला पंचरंगी दोरा दिला. हेच नाहीतर यावेळी त्याने ताबीजसुद्धा दिले. दरम्यान, ७ फेब्रुवारी रोजी रात्री १२ वाजेनंतर विवाहितेचे पोट पुन्हा दुखायला लागले. त्यामुळे त्यांच्या सासऱ्यांनी आरोपी मांत्रिक दिगांबर चव्हाण महाराज याला मोबाइलवर कॉल केला. फोनवर मांत्रिकाने सांगितले की, उद्या विवाहितेला अमरावतीला माझ्याकडे घेऊन या. त्यानुसार, फेब्रुवारी रोजी सकाळी पीडित विवाहिता व तिचे सासरे मांत्रिक दिगांबर चव्हाण महाराज याच्या घरी गेले.त्यावेळी त्याने विवाहितेला एका दुसऱ्या खोलीत नेले. त्याने यावेळी तिला झोपायला सांगितले. त्याने विवाहितेच्या डोक्यावर काही मंत्रोपच्चार केले. डोळ्याला व अंगाला लिंबू घासले. तुझी दुखापत दूर करतो, तुझे पोट दुखणार नाही, तुझा गर्भपात होणार नाही, अशी बतावणी करून त्याने विवाहितेवर अत्याचार केला. त्याचवेळी सदर प्रकाराची वाच्यता केल्यास तुझ्यावर जादूटोणा करेल व तुला पाहून घेईन, अशी धमकी त्याने पीडितेला दिली.

# देवमाणूस साठी सज्ज व्हा! मालिका नव्हे सिनेमा, महेश मांजरेकरांसोबच दिसणार ही तगडी स्टारकास्ट




**मुंबई-** जानेवारी महिना सुरू झाल्यापासून बऱ्याच सिनेमांची घोषणा होऊ लागल्या. तर बरेच सिनेमे रिलीज होऊ लागले. हिंदी सिनेमांच्या तोडीस तोड असलेले मराठी सिनेमे सुद्धा प्रेक्षकांची मनं जिंकत आहेत. अशातच आता महेश मांजरेकर यांच्या नव्या सिनेमाची घोषणा झाली आहे. तेजस देऊस्कर दिग्दर्शित आणि लव रंजन आणि अंकुर गर्ग निर्मित मल्टीस्टारर मराठी चित्रपट देवमाणूस ची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत आणि नुकतेच या चित्रपटात असलेल्या कलाकारांचे पोस्टर्स लाँच करण्यात आलेत. महेश मांजरेकर, रेणुका शहाणे, सुबोध भावे आणि सिद्धार्थ बोडके अशा ह्या दिग्गज आणि पॉवरहाऊस कलाकारांचे वैशिष्ट्य असलेले पोस्टर्स चाहत्यांना सिनेमात असलेल्या त्यांच्या प्रभावशाली स्वरूपाची एक झलक देतात जे नक्कीच उद्या रिलीज होणाऱ्या बहुप्रतिक्षित देवमाणूस टीझरच्या अपेक्षा वाढवतात. रिलीझ झालेल्या ह्या पोस्टर्स मध्ये आपण चित्रपटाच्या मुख्य पात्रांचे अतिशय मोहक फर्स्ट लुक पाहू शकतो. अभिनेते महेश मांजरेकर ह्यांचा खूपच साधा पण इंटेन्स लुक आपल्याला दिसून येतो, त्यांची भेदक नजर त्यांच्या या भूमिकेची गंभीरता सांगते. अभिनेत्री रेणुका शहाणे ह्यांचा मायाळू, सरळ देखावा आणि मनमोहक लुक लक्ष वेधून घेणारा आहे तर सुबोध भावे ह्यांना पोलिसांच्या हटके भूमिकेत पाहू शकतो तसेच अभिनेता सिद्धार्थ बोडके त्याच्या हसण्याने सिनेमाचं आणि त्याच्या भूमिकेचं रहस्य वाढवतो. अशा या अनोख्या पोस्टर्समुळे उद्या टीझरमध्ये नक्की काय असणार आहे याची उत्सुकता सर्वांना आहे.लव फिल्म्स प्रस्तुत, देवमाणूस या चित्रपटाचे दिग्दर्शन तेजस प्रभा विजय देऊस्कर ह्यांनी केले आहे. लव रंजन आणि अंकुर गर्ग निर्मित आहे. हा चित्रपट २५ एप्रिल २०२५ रोजी आपल्या जवळच्या चित्रपटगृहांमध्ये रिलीज होणार आहे.

# पैसे कमावण्याचे इतर पर्याय आहेत, मी पैशांसाठी नाटक करत नाही, शिल्पा तुळसकरचं वक्तव्य चर्चेत





नाटकाचं यश हे त्या नाटकाच्या कुटुंबावर अवलंबून असतं. कलाकारांचे, तंत्रज्ञ मंडळींचे ३६ गुण जुळून यावे लागतात. आमच्या मी व्हर्सेस मी या नाटकातील प्रत्येक नट आणि पडद्यामागील प्रत्येक जण हा सुख या एकाच कारणास्तव हे नाटक करतोय. मी पहिल्यांदा हे नाटक ऐकलं तेव्हा मला नाटकाचा विषय आणि लेखक संजय जमखंडी याचा प्रामाणिकपणा विशेष भावला. गेल्या काही वर्षांत मी ज्या नवोदित आणि तरुण मंडळींसोबत काम केलं आहे, त्यांच्याविषयी माझं एक निरीक्षण व अनुभव असा होता की, त्यांना एकंदरच त्यांच्या कलेविषयी आस्था नाहीय. त्यांच्यात प्रामाणिकपणा, आदर फारसा दिसत नाही. त्यामुळे या कलासाधनेच्या प्रक्रियेत ते बरंच काही गमावत आहेत. पण कुशल आणि आपल्या कलेप्रती प्रचंड उत्साही व महत्त्वाकांक्षी मंडळीदेखील मला भेटली. त्यातीलच एक म्हणजे लेखक-दिग्दर्शक संजय जमखंडी. स्वतःच्या चौकटी बाहेरील विचारांना मूर्त रूप देऊन त्यानं मी व्हर्सेस मी हे नाटक लिहिलंय, हाच प्रामाणिकपणा मला भावला.अलीकडेच वर्षभरात माझ्याकडे आलेल्या बहुतांश संहिता अत्यंत सुमार होत्या. मला मध्यवर्ती, मोठ्या लांबीची किंवा प्रमुख भूमिकाच हवी, असा माझा हट्ट नव्हता आणि यापुढेदेखील नसेल. पण इतक्या वर्षांच्या अनुभवानंतर किमान माझ्या असण्यानं किंवा मी साकारणाऱ्या भूमिकेमुळे त्या कलाकृतीत फरक पडावा, अशी माझी अपेक्षा असते. मी व्हर्सेस मी या नाटकात माझी प्रमुख भूमिका नाहीय, भूमिकेची लांबीदेखील कमी आहे, पण नाटकाची संहिता आणि नाटक सुचवू पाहणारा विचार मोठा आहे. कॉम्प्रोमाइज करायचंच असेल तर मी माझ्या भूमिकेच्या लांबीवर करेन; पण संहिता मला प्रभावशाली हवी. ऋषिकेश जोशी म्हणाला की, आम्ही पोट भरण्यासाठी नाटक करत नाही तर मन भरण्यासाठी नाटक करतो, असंच काहीसं माझं आहे. मला कामासाठी माझ्या दोन मुलांपासून लांब राहावं लागत असेल तर त्या कामातून मला समाधान मिळायला हवं. व्यावसायिक दृष्ट्या पैसे कमावण्याचे इतर पर्याय आहेत. मी पैशांसाठी नाटक करत नाही. - या नाटकाला, नाटकाच्या विषयाला पाठबळ मिळावं, म्हणूनच मी या नाटकाची सहनिर्मातीदेखील झाले. विषय मोजक्या शब्दांत सांगता येणार नाही. रंगभूमीवर अनुभवण्याजोगा सकस विषय आम्ही - प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न केलाय. प्रथमदर्शी मी व्हर्सेस मी हे नाटक गूढ आणि थरारक धाटणीचं - असलं तरी समाजातील काही संवेदनशील विषयावर - आणि मानवी नात्यांवर भाष्य करतं. नाटकात विविध - ठिकाणं असल्यानं नाटकातली दृश्यरचना प्रेक्षकांसाठी पर्वणी आहे. संदेश बेंद्रे यानं नेत्रदीपक नेपथ्य घडवलं आहे. प्रयोगानंतर बॅकस्टेजला आम्हाला भेटायला येणारे प्रेक्षक सर्वात पहिल्यांदा नाटकातील सेटचं भरभरून कौतुक करतात आणि नंतर आम्हाला आमच्या अभिनयाची पोचपावती देतात. काही प्रेक्षक तर केवळ नेपथ्य पाहण्यासाठी प्रयोगाला आलो, असं सांगतात. आमचा प्रकाशयोजनाकार अमोघ फडके याचंही प्रेक्षक कौतुक करतात. एकंदरच केवळ आम्ही कलाकारच नव्हे तर या नाटकासाठी काम करणारा प्रत्येक व्यक्ती हा या नाटकाचा चेहरा आहे. नाटकाच्या नावाप्रमाणे मी व्हर्सेस मीचं एक अनोखं आणि मनोरंजक द्वंद्व यात आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# खामगांव शासकीय तंत्र निकेतन संस्थेतील निर्लेखित साहित्यांचा लिलाव

**जनसंचलन/खामगाव**

खामगांव शासकीय तंत्र निकेतन खामगांव या संस्थेतील विविध विभागांमधील जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी, कालबाह्य व निर्ले खित झालेले यंत्र, उपकरणे इत्यादी साहित्य लिलावा पद्धतीने विक्री करावयाची आहे. इच्छूक खरेदीदार, भंगार व्यावसायिक, कंत्राटदार यांचेकडून सीलबंद लिफाफ्यामध्ये निविदा मागविण्यात येत आहेत. लिलाव संदर्भातील सविस्तर माहिती www.gpk.edu.in या संकेतस्थळावर तसेच संस्थेच्या मुख्य सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. इच्छुक खरेदीदार यांनी दि. १ मार्च २०२५ पर्यंत निविदा सादर करावे, असे आवाहन शासकीय तंत्र निकेतनचे प्राचार्य यांनी केले आहे.

# बबनराव देशमाने यांना पत्रयोगी जीवन गौरव पुरस्कार जाहीर

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा जिल्हा पत्रकार संघातर्फे पत्रयोगी जीवन गौरव पुरस्कारासाठी बबनराव देशमाने यांची निवड झाली असून रविवार १६ फेब्रुवारी रोजी केंद्र व राज्यातील मंत्री आमदार व अन्य क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत बुलढाण्यात त्यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे. बबनराव देशमाने यांनी रायपूर सैलानी सारख्या ग्रामीण भागात गेली ३० वर्षे दैनिक तरुण भारत, महासागर या वृत्रपत्रामध्ये पत्रकारीता करीत अनेक ग्रामीण समस्यांना वाचा फोडली आहे. १९८२ मध्ये संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडणार्या सैलानीतील बबीता सोमानी हत्याकांड त्यांनी उघडकीस आणून आरोपी गजाआड करत न्यायालयीन शिक्षा होण्यापर्यंत सतत वृत्तांकन केले होते. यात कृषी व ग्रामीण समस्यांवर त्यांनी विपुल लिखान करुन समस्यांना वाचा फोडली होती. ते एक आदर्श शेतकरी होते. जिल्हा परिषद कृषी विभागाने



या अगोदर त्यांना सन्मानीत केले होते. पत्रकार क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल त्यांना पत्रयोगी जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

# बुधवारी जय शिवाजी, जय भारत पदयात्रा

**जनसंचलन/बुलढाणा**

छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त दि. १९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता ज्ञजय शिवाजी, जय भारतफ पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या पदयात्रेला शहरातील सर्व शैक्षणिक संस्थेमधील शिक्षक, क्रीडा प्रेमी तसेच विविध खेळ संघटनांचे पदाधिकारी, शिवप्रेमी, प्रतिष्ठीत नागरिक, अधिकारी कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाव्दारे करण्यात आले आहे. जिल्हा प्रशासन, नगरपरिषद, शिक्षण विभाग, क्रीडा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, नेहरु यवा केंद्र व एन.सी.सी. यांच्या संयुक्त विद्यमाने जय शिवाजी, जय भारत पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या पदयात्रेचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने होणार असून उद्घाटनानंतर मान्यवराचे संबोधन होऊन पदयात्रेला प्रारंभ होईल.

# एक -एक रुपये घेणारे भिकारडे सरकार!

## याच पैशावर होतो करोडांचा घोटाळा- जयश्रीताई शेळके

**जनसंचलन/बुलढाणा**

महायुती सरकारच्या काळात पीक विमा योजनेत प्रचंड मोठा भ्रष्टाचार झाल्याचे आरोप विरोधकांकडून होत असतानाच राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी एक महत्वाचे वक्तव्य केले आहे. हल्ली भिकारीसुद्धा एक रुपया घेत नाही. पण आम्ही एक रुपयात शेतकऱ्यांना पीक विमा दिला, असे माणिकराव कोकाटे यांनी म्हटले. त्यांच्या या वक्तव्याने वादंग निर्माण होण्याची चिन्हे आहेत.दरम्यान शिवसेना नेत्या जयश्रीताई शेळके यांनी या विधानाबाबत संताप व्यक्त केला आहे.एक -एक रुपये घेणारे भिकारडे सरकार आता याच पैशांवर करोडो रुपयांचा भ्रष्टाचार करणार असल्याचा आरोप शेळके यांनी केला आहे. हल्ली भिकारी ही एक रुपया घेत नाही, पण आम्ही शेतकऱ्यांना एक रुपयात पिक विमा दिला. असे वक्तव्य राज्याचे कृषिमंत्रीच करत असेल तर ती या राज्यासाठी मोठी लाजिरवाणी गोष्ट आहे. कृषिमंत्र्यांनी राज्य शासनाने एक रुपया घेऊन पिक विमा दिला म्हणजे शेतकऱ्यांवर कोणतेही प्रकारचे उपकार केले नाहीत.शेतकऱ्यांकडून एक- एक रुपया घेणारे भिकारडे राज्य सरकार शेतकऱ्यांना हक्काचा पिक विमा देऊ शकले नाही ही वस्तुस्थिती आहे. शेतकऱ्यांकडून घेतलेल्या एक-एक रुपयांवर करोडो कोटींचे घोटाळे करणाऱ्या राज्य सरकारचा आणि अशा कृतघ्न आणि निर्लज्ज कृषीमंत्र्यांचा जाहीर निषेध करते,असा संताप जयश्रीताई शेळके यांनी व्यक्त केला.महायुती सरकारने एक रुपयात पीक विमा योजना सुरु केली होती. मात्र, काही लोकांनी त्याचा गैरउपयोग केला. पीक विमा योजना ही यशस्वी झाली पाहिजे, त्याचा योग्य लाभ शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे. पीक विमा योजनेबाबत



चांगले-वाईट अनुभव सरकारच्या पाठीशी आहेत. पीक विमा कंपन्या शेतकऱ्यांची लुटमार करतात. सरकारला पीक विमा योजना बंद करायची नाही. पीक विमा योजनेत सुधारणा करायची आहे. पीक विम्यातील गैरप्रकार टाळण्यासाठी काही निर्णय घ्यावे लागतील. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यासोबत बैठकीत योग्य निर्णय होईल, असे माणिकराव कोकाटे यांनी म्हटले आहे.

# खरे सोने देण्याचे आमिष दाखवून दिले नकली सोने!

## तब्बल ९ लाख ५० हजारांची फसवणूक!

**जनसंचलन/बुलढाणा**

खरे सोने देण्याचे आमिष खरे सोने देण्याचे आमिष दाखवून ९ लाख ५० हजार रुपयांची रोख रक्कम घेऊन नकली सोने दिल्याची घटना अमडापूर पोलीस स्टेशन अंतर्गत घडली आहे.युवराज अजबराव चव्हाण २८ रा.दर्गा पराड तालुका अंबड जिल्हा जालना असं या आरोपीचे नाव आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वाखाली सदर कारवाई करण्यात आली. आरोपी विरोधात अमडापूर पोलीस स्टेशनमध्ये १०/२५ कलम ३१८ (४), ३ (५) बी एन एस प्रमाणे गुन्हा दाखला होता.याप्रकरणी तांत्रिक विश्लेषण करून तपास करण्यात आला. दरम्यान आरोपीला पकडण्यात आले. आरोग्य कडून नकली सोन्याचे फोटो व्हाट्सअप वर पाठवण्यासाठी वापरण्यात आलेला मोबाईल जप्त करण्यातआला आहे. शिवाय आणखी दोन मोबाईल व एक खोटे सिविल कॉन्ट्रॅक्टर विजिट कार्ड चा बॉक्स आणि पांढऱ्या रंगाची मारुती सुझुकी आरोपी कडून जप्त करण्यात आली आहे.सदर तपास एपीआय संजय मातोंडकर,पीएसआय दत्ता नरवाडे, विजेता पवार, ऋषिकेश थूट्टे, कोमल इंगळे, चालक निवृत्ती पुंड,भगवान शेवाळे,शिवाजी सुरडकर, चंद्रशेखर मुरडकर,ऋषिकेश खंडेराव या पथकाने केला आहे.

# विश्वकर्मा प्रगटदिन उत्सवात नीरज रायमुलकर यांच्या हस्ते महाप्रसाद वितरण

**जनसंचलन/मेहकर**

स्थानिक लोखंडी पायऱ्या परिसरातील विश्वकर्मा मंदिर येथे आज विश्वकर्मा प्रगटदिन महोत्सव साजरा करण्यात आला.यावेळी शारंगधर पतसंस्थेचे कार्यकारी संचालक तथा युवासेनेचे नेते नीरज रायमुलकर यांच्या हस्ते भाविकांना महाप्रसाद वितरण करण्यात आले. विश्वकर्मा प्रगट दिन महोत्सव समितीच्या वतीने काल व आज विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. आज सकाळी रवींद्र राऊत, विजय राऊत यांनी सपत्नीक स्वामी विश्वकर्मा यांच्या प्रतिमेला महाअभिषेक केला .त्यानंतर तालुक्यातून आलेल्या सुतार समाज बांधवांनी महाआरती केली. माऊली भजनी मंडळाच्या वतीने भजन संध्या कार्यक्रमात कलावंतांनी भजने सादर करून भाविकांची मने जिंकली. महोत्सवात आदिनाथ राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली विश्वकर्मा योजना नोंदणी शिबिर घेण्यात आले , त्यात



युवकांनी मोठा सहभाग नोंदवला. नीरज रायमुलकर यांनी स्वामी विश्वकर्मा यांच्या प्रतिमेचे पूजन करून महाआरती केली. महोत्सव समितीच्या वतीने आयोजित महाप्रसाद वितरण कार्यक्रमात नीरज संजय रायमुलकर यांच्या हस्ते भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. यावेळी भाविकांचे मोठी उपस्थिती होती. प्रगट दिन महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी उत्सव समिती चे पदाधिकारी आणि सुतार समाज बांधवांनी परिश्रम घेतले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलढाणा शहरात मोफत टेस्ट ट्युब बेबी वंधत्व तपासणी शिबीराला मिळाला उदंड प्रतिसाद...

## डॉ अशिष सावळे यांचे आनंदी हॉस्पिटल तसेच डॉ योगेश शिंदे यांचे मम्मी अँड मी हॉस्पिटल यांच्या सौजन्याने घेण्यात आलेल्या शिबीराला जिल्ह्यातील अनेक लोकांनी लावली हजेरी...

जनसंचलन/बुलढाणा

आई बाबा हे होण्याचे सुख् प्रत्येकांना हवे असते कोणी या सुखाला नाही म्हणत नाही. मात्र काही ठिकाणी काही कारणास्तव हे सुख मिळत नाही मात्र त्याला पर्याय उपलब्ध झाला आहे.टेस्ट टयूब बेबी हि सुविधा आता आली आहे. महाराष्ट्रातील सर्वाधिक यशस्वी टेस्ट टयुब बेबी सेंटर यांचे आनंदी हॉस्पिटल तसेच मम्मी अॅन्ड मी हॉस्पिटल द्वारे आयोजित बुलढाणा येथे २३ जानेवारी रोजी डॉ अशिष सावळे यांचे आनंदी हॉस्पिटल या ठिकाणी मोफत टेस्ट ट्युब बेबी व वधंत्व तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी जिल्ह्यातील तसेच जिल्ह्या बाहेरी पेशंट यांनी उपस्थिती लावली होती.या ठिकाणी ५० पेक्षा जास्त पेशंट आले होते. चिखली,जळगाव जामोद, मलकापूर,बुलढाणा,धाड,तसेच रायपूर आणि त्या भागातील अनेक गावातील




पेशंट या ठिकाणी आले होते. यामध्ये मार्गदर्शन देण्यात आले आणि अनेक पेशंटवर उपचार सुध्दा सुरू करण्यात आला आहे.आई बाबा होण्याची ओढ हि प्रत्येकांना असते.त्यामुळे या शिबीराला आलेल्या पेशंटच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला आहे.त्यांच्यावर उपचार सुरू करण्यात आला आहे.जिल्ह्यातील कानाकोपऱ्यातून लोक या ठिकाणी आले होते.आणि लवकरच हे शिबीर आता पुन्हा घेण्यात येणार आहे असे डॉक्टर अशिष सावळे यांनी सांगितले आहे.

# बुलढाण्यात निघाला स्व.स्नेहल चौधरीसाठी कॅन्डल मार्च!

## अॅड.जयश्रीताई शेळके म्हणाल्या गुन्हेगाराला पाठीशी घालणे दुर्दैवी!





जनसंचलन/बुलढाणा

भरदिवसा एका दूचाकीवरील माय लेकीला बेदाराकपणे बोलेरो धडक देते व २४ वर्षाच्या युवतीचा त्यात निष्पाप जीव जातो, हे दुदैव तर आहे शिवाय काही लोक प्रशासनावर दबाव आणून गुन्हेगाराला पाठीशी घालतात हे अत्यंत दुर्दैवी बाब असल्याची चीड शिवसेना नेत्या अॅड. जयश्रीताई शेळके यांनी व्यक्त केली आहे.काल स्व. स्नेहल संदीप चौधरी हिला भावपूर्ण श्रद्धांजली देण्यासाठी चांडक लेआउट ते त्रिशरण चौक दरम्यान कॅण्डल मार्च काढण्यात आला.याप्रसंगी जयश्रीताई शेळके बोलत होत्या. त्यांनी आरोपीला कठोरात कठोर शिक्षा द्यावी अशी मागणीही केली आहे. स्नेहल संदीप चौधरी रा. चांडक ले आऊट, सुंदरखेड बुलडाणा या युवतीचे १० फेब्रुवारी रोजी अपघाती निधन झाले. तिच्या स्कुटीला एका मद्यधुंद बोलेरो वाहन चालकाने जोरदार धडक दिल्याने तिचा जागीच मृत्यू झाला होता. काल सायंकाळी ६ वाजता चांडक लेआउट ते त्रिशरण चौक कॅन्डल मार्च काढण्यात आला आहे. दरम्यान आज स्नेहलताई उद्या कोण?, सरकार कोणासाठी?, निर्दोष मरतात गुन्हेगार मोकाट फिरतात..हे अन्यायाचं राज्य आहे का?असे अनेक प्रश्न यावेळी उपस्थित करण्यात आले.या कॅन्डल मार्चमध्ये असंख्य महिला मुली मुले वृद्धांचा सहभाग होता.

# वाहने सुसाट नियम चाकाखाली! कायदेशीर ब्रेक कधी लागेल?

जनसंचलन/बुलढाणा

विनापरवाना आणि कागदोपत्री पूर्तता नसलेली अवैध वाहने जिल्ह्यात सुसाट धावत असून, परिवहन कार्यालय अशा वाहनांना कायदेशीरब्रेक कधी लावेल? असा प्रश्न शिवसेना प्रणित शिव वाहतूक सेना ने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात उपस्थित केला आहे. शिवाय वाहनांचे फिटनेस प्रमाणपत्र नसल्यास सदर वाहने शासन जमा करण्याची आग्रही मागणी करीत आंदोलनाचा इशारा दिलाय! बुलढाणा जिल्ह्यातील काळी-पिवळी, वाहतुक ऑटो रिक्शा, स्कुल बसेस व इतर बरेचशी वाहने विनापरवाना कागदोपत्री पुर्तता नसलेली वाहने सर्रास धावताहेत. अशा ब-याचशा वाहनांचे आजपर्यंत अपघात सुद्धा झालेले आहेत. त्यामध्ये अनेक नागरीकांची जिवीत हानी झाली.. कायम स्वरुपी अपंगत्व सुद्धा आलेले आहे.अशा वाहनांवर कुठल्याही प्रकारची कार्यवाही न करता सर्रास ही वाहने परत जिल्ह्यातील वाहतुकीसाठी रोडवर सुसाट वेगाने पळताहेत, या सर्व बाबींना जबाबदार जिल्ह्यातील परीवहन कार्यालयातील अधिकारी तसेच जिल्हा पोलीस वाहतुक कार्यालयातील सर्व वाहतुक कर्मचारी यांचे संगणमत असल्यामुळे हा प्रकार सर्रास सुरु असल्याचा आरोप शिव वाहतूक सेने ने केला आहे. १० फेब्रुवारी रोजी बुलढाणा मध्ये झालेल्या अपघातामध्ये एका मद्यधुंद चालकाने बेकायदेशीर जलद गतीने वाहन चालवून एका तरुणीला उडवीले असुन तिचा मृत्यु झालेला आहे.या घटनेवरुन असे लक्षात येते की, बुलढाणा आर. टी ओ, अधिकारी-कर्मचारी झोपेत आहे. व शहरातील ट्रॅफीक पोलीस यंत्रणा फक्त नावापुरत्या शासकीय ड्युट्या करीत आहे. तरी सदर घटनेची चौकशी होणे गरजेचे आहे. या गैरप्रकारावर कुठेतरी त्वरीत आळा बसावा व कार्यवाही व्हावी आणि ज्या वाहनांचे किंवा वाहन चालकांचे परवाने व वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नसेल ती वाहने त्वरीत शासन जमा करुन घेण्यात यावी अशी बुलढाणा जिल्हा शिववाहतुक सेनेची आग्रही मागणी असल्याचे निवेदनात म्हटले आहे. विशेष चौकशी बसवुन तात्काळ कारवाई करावी. येत्या २४ तासाच्या आत कारवाई यावी,अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र उपोषण सोडण्यात येईल असा इशारा,शिव वाहतूक सेनेचे जिल्हाप्रमुख राजेश मुंगळे यांनी दिला आहे.

# डॉ. होमीभाभा प्रात्यक्षित परिक्षेत सहकर विद्या मंदिरच्या विद्याश्र्याचे सुयश

जनसंचलन/बुलढाणा

मुंबई सायन्स टिचर्स असोसिएशन च्या वतीने घेण्यात आलेल्या डॉ. होमीभाभा बालवैज्ञानिक परीक्षेच्या प्रात्यक्षिक परिक्षेत सहकार विद्या मंदिर, बुलडाणा येथील चि. त्रिलोकेश भवटे (वर्ग ६ वा) आणि चि.पार्थ तायडे (वर्ग ९ वा) या दोन्ही विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले. सदर परीक्षा तीन स्तरावर घेण्यात येत असते. यामध्ये चि.त्रिलोकेशने प्रथम स्तरावर ८० गुण आणि द्वितीय स्तरावर १९.५ गुण प्राप्त केले तसेच चि.पार्थने प्रथम स्तरावर ७६ आणि द्वितीय स्तरावर १७.५ गुण प्राप्त केले. यानंतर त्या दोघांचीही तृतीय




स्तरासाठी (मुलाखत) निवड झालेली आहे. त्रिलोकेश व पार्थ यांचे अभिनंदन संस्थेच्या अध्यक्षा सौ.कोमल झंवर, प्राचार्य व मुख्याध्यापिका यांनी केले असुन त्याला पुढील परिक्षेसाठी शुभेच्छा दिल्यात. त्रिलोकेश व पार्थनी त्याच्या यशाचे श्रेय संस्थेच्या अध्यक्षा, प्राचार्य, मुख्याध्यापिका व सर्व शिक्षकवृंदाना दिले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958